डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

वाघापुर रोड, यवतमाळ - ४४५ ००१ (म.रा.)
दुरध्वनी क. (०७२३२) - २४८२३५ फॅक्स - (०७२३२) - २४८२३५
E-Mail – pckvkytl@yahoo.co.in

ICAR

जा.क्र.कृविकें/यवत/२१९/२०२२ दिनांक : २८ /०७ /२०२२

## दरपत्रक मागणी पत्र

प्रति,

१. ..........................................................................
२. ..........................................................................
३. ..........................................................................
४. ..........................................................................
५. ..........................................................................

**विषय:** कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ मार्फत आर्थिक वर्ष २०२२-२३ साली आयोजीत विविध प्रशिक्षण व कार्यक्रमा करिता जेवण, चहा व नाश्ता (फराळ) करीता दर पुरविण्याबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ येथे मा. संचालक, अटारी, पुणे यांचे प्राप्त निर्देशनानुसार विविध विषयाचे प्रशिक्षण कार्यक्रम, कृषि मेळावे (खरीपपूर्व, रब्बीपूर्व), कृषि तंत्रज्ञान सप्ताह, विषयानुरूप विविध प्रशिक्षणे, प्रायोजीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, शिवारफेरी, शास्त्रीय सल्लागार समिती सभा, राष्ट्रिय कृषि विकास योजना (आरकेव्हीवाय) कौशल्या आधारीत ग्रामीण युवकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम (एस टी आर वाय), राष्ट्रिय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत किटकनाशक प्रतिकारक्षमता व्यवस्थापन तसेच देशी अंतर्गत कृषि निविष्ठा विक्रेत्यांकरीता कृषि पदविका अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण कार्यक्रम इ. विस्तार कार्यक्रमाचे आयोजन होत असते. सदर प्रशिक्षण व तांत्रिक कार्यक्रमाकरीता कमीत कमी १५ ते २०० किंवा जास्त लाभार्थी हजर राहु शकतात. तरी त्यांचे भोजन व्यवस्थेकरीतं आपणांकडून वर्ष भराकरीता खालील अटींवर दरपत्रक मागविण्यात येत आहे तरी अटी मान्य असल्यास दरपत्रक सादर करावे. पुढे नमुद केलेल्या विवरणासाठी आपले दरपत्रक पाठवावे. हि विनंती.

(PTO)

| अ.क्र | विविरण वैशिष्टयांसह | शेरा |
|---|---|---|
| १ | **मर्यादित अल्प भोजन :**<br>भाकर + पिठलं / भाकर + भरीत / मसाले भात + कढी इ. | यवतमाळ साठी व काम पडल्यास यवतमाळ च्या बाहेर दोन्ही ठिकाणा साठी दर द्यावेत. |
| २ | **साधे जेवण :**<br>वरण + भात + भाजी + पोळी + सलाद/कोशिंबीर + चटणी + मीठ इ. | |
| ३ | **स्पेशल जेवण :**<br>वरण + भात + भाजी (३) + पोळी + एक स्वीट डिश (मर्यादित) + पापड+ भजे + लोणचे + सलाद + मिठ इ. | |
| ४ | **डिलक्स जेवण :**<br>दाल फ्राय + जिरा राईस + भाजी (३) + पुरी/पोळी + एक स्वीट डिश (मर्यादित)+ दही + पापड + भजे + लोणचे + सलाद + मिठ + कढी/मठ्ठा + फरसाण इ. | |
| ५ | **सुपर डिलक्स जेवण :**<br>सुप + दाल फ्राय + जिरा राईस + भाजी (३) + पुरी/पोळी + एक स्वीट डिश (अमर्यादित)+ दही + पापड + भजे + लोणचे + सलाद + मिठ + कडी/मठ्ठा + फरसाण, इ. | |
| ६ | **चहा / कॉफी** | |
| ७ | **नाश्ता (फराळ)** | |

**कृपया दर नमुद करतांना खालील दिलेल्या सुचना काळजीपूर्वक लक्षात घ्याव्यात.**

१. दरपत्रक बंद पाकिटातच पाठवावेत.

२. दरपत्रकाच्या पाकिटावर पुढीलप्रमाणे नमुद करावे **'जेवण व चहापाणी पुरविण्याकरीता दरपत्रक' आपले संदर्भांकित चौकशी पत्रक जा.क्र.कृविकें/यवत/ २१९/२०२२ दिनांक :२८/०७ /२०२२**

३. दरपत्रक पोहचविण्याची अंतिम तारीख व पत्ता **दि. ०८/०८/२०२२** रोजी दुपारी १७:०० वाजेपर्यंत **कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, वाघापुर रोड, यवतमाळ** येथे पोहचणे आवश्यक आहे.

४. जेवण, चहा व नाश्ता (फराळ) पुरवठाधारकाकडे अन्न व औषध प्रशासनाचा परवाना असणे बंधनकारक आहे.

५. देयक / बिल हे GST क्रमांकासह असणे बंधनकारक आहे..

६. जेवण चांगले व स्वच्छ प्रतिचे असणे बंधनकारक राहिल.

७. दोन वेळचा चहा, पाणी व भोजन वाढण्याची जबाबदारी आपली स्वत:ची राहील याची नोंद घ्यावी.

८. सदर कार्यक्रमांकरीता कमीत कमी १५ ते २०० किंवा जास्त लाभार्थी हजर राहु शकतात. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे कार्यक्रमात जेवण, चहा व नाश्ता (फराळ) पुरविण्यात येणे बंधनकारक आहे.

९. एखादेवेळी वेळेवर कळविल्यास जेवण देण्याची तयारी ठेवावी लागेल.

१०. पिण्याच्या पाण्याची सोय करणे बंधनकारक राहिल.

११. कोरोना-१९ प्रादुर्भाव लक्षात घेता मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी नेमुन दिलेल्या नियमावलीचे पालन करणे बंधनकारक राहिल.

**कार्यक्रम समन्वयक**
**कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ**